# ऑलराउंडर

'मी नांदेडचा ' असं सांगितल्यावर समोरचा जर मराठवाड्याच्या सांस्कृतिक क्षेत्रातील घडमोडींशी थोडाफार जरी परिचित असेल, तर लगेच विचारतो, 'मग ग. ना. अंबेकर तुमचे कोण?'. त्याच्या प्रश्नात बदल करण्याचे थेट न सुचविता, मी उत्तरतो, '(ते माझे कोण असं सांगण्यापेक्षा उलट मी सांगेन-) मी त्यांचा नातू'. माझ्या उत्तरातलं मर्म समोरच्याला समजलं आहे का, याचा अंदाज घेण्यासाठी मी क्षणभर त्याच्या चेहर्यालकडे पाह्यतो.

मराठवाड्याच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात माझ्या आजोबांनी अत्यंत निरालसपणे पण कायम पडद्याआड राहून कलाकार आणि रसिक घडविण्याचं फार मोठं काम केलंय. सामाजिक जीवनात विनम्र, अबोल आणि प्रसिद्धीपराङ्मुख असलेल्या आमच्या अण्णांचा घरात मात्र प्रचंड दरारा होता. औरंगाबादेत नौकरीत स्थिरवल्यावर लग्नाळलेल्या वयात असताना मी त्यांना दोन का तीन पानी पत्र लिहून मी मला पसंत असणार्याद मुलीशी नोंदणीपद्धतीनं लग्न करणार असं कळविण्याचं धारिष्ट्य केलं होतं. आणि मुलगी मीच पाहीन (तुम्ही कष्ट घेऊ नका) असंही कळविलं होतं.

दहा बारा प्रशिक्षणार्थी तरूण पत्रकारांचा एक उत्साही गट त्यावेळी लोकमतमध्ये होता. त्यांच्या बोलण्यात ज्योती नावाच्या मुलीचा उल्लेख असायचा. कारण त्यातल्या दोघांनी विद्यापीठात पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेला होता आणि ज्योती विद्यापीठात वसतिगृहात राहून तोच अभ्यासक्रम करीत होती.

नोकरीच्या प्रयत्नात ती एक दोन वेळा लोकमतला आली होती. मी रात्रपाळीला असल्यानं तिला पाहिलेलं नव्हतं.

बाबा दळवी आमचे संपादक होते. अशोक पडबिद्री संपादन साहाय्यासाठी लोकमतला नुकतेच आले होते. ते गप्पिष्ट होते. नोकरीच्या प्रयत्नात असलेली ज्योती त्यांनाही माहीत होती. एकदा चार चौघात सहज बोलताना त्यांनी त्यांच्या खास शैलीत ओठातल्या कोपर्याहत हसून विचारलं, 'अरे तुम्ही ज्योतीशी का लग्न करीत नाही?' मी म्हणालो, 'मी तिला ओळखत नाही'.

मी एमएला (अर्थशास्त्र) विद्यापीठात बाहेरून नाव नोंदविलं होतं. पण क्लासेससाठी विद्यापीठात जायचो. लोकमतमध्ये प्रशिक्षणार्थी असणारा मोहन राठोड विद्यापीठाच्या वसतिगृहात राहात होता आणि पत्रकारितेचा अभ्यासक्रम करीत होता. त्याला मी 'ज्योती' हे काय प्रकरण आहे ते विचारलं. पडबिद्रींची कॉमेंट सांगितली. त्याला भयंकर आनंद झाला. त्यानं खूप उत्साहानं तिच्याबद्दल सांगितलं. मी म्हंटलं ओळख करून दे. त्यानं एकदम मनावर घेतलं. दुसर्याम दिवशी मी विद्यापीठात गेलो. तो मला मुलींच्या वसतिगृहाकडे घेऊन गेला. ज्योती अगदी घरगुती वेशात आली. सहज भेटल्यागत त्यानं आमची ओळख करून दिली. तिला पाहून चांदणं पसरलं वगैरे असं काही झालं नाही. पण तिच्यात स्पार्क आहे असं जाणवलं. लातूरसारख्या भागातून येऊनही अनोळखी माणसाशी बोलताना बुजरेपणा नाही, एकदम भिडरहीत थेट बोलणं, प्रसन्न आणि हसतमुख चेहरा अशी पहिली छाप पडली.

असेच दोन तीन दिवस गेले. एकदा रविवारी सकाळी वृत्तपत्रांच्या पुरवण्या वाचण्यासाठी लोकमतच्या संपादकीय विभागात बसलो होतो. पडबिद्रीही होते. मोहन होता. बाकी फारसं

कोणी नव्हतं. सहज मान वर केली आणि पाहिलं तर दारात ज्योती होती. छान साडी आणि गजरा! थेट पडबिद्रींकडे गेली. ते हसले आणि तिला घेऊन संपादकांच्या केबिनमध्ये गेले. मी एकदम सपटपटलो. आता ते तिला काय विचारणार? पंधरावीस मिनिटांनी ती बाहेर आली. एकदम तिरमिरीत. चेहरा उतरलेला. मोहनला हळूच म्हणाली, ‘बाहेर ये’. तो तिच्या बरोबर गेला. मी पडबिद्रींना विचारलं. ते नेहमीच्या मिश्किलीत म्हणाले, ‘काही नाही ती तुमच्याशी लग्न करू शकेल का याचा अंदाज घेतला. ’ मी मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला. काही वेळानं मोहन आला. तोही गांगरलेला दिसला. म्हणाला, ‘बरीच अस्वस्थ होती. म्हणत होती..मला वाटलं नोकरीसाठी बोलावलं आणि विचारताहेत लग्नाचं...’

संध्याकाळी तिचा लोकमतला माझ्यासाठी फोन आला. मी घेतला. अगोदर तिनं मला फैलावर घेतलं. ‘हा काय प्रकार आहे? मी तुम्हाला फारशी ओळखत नाही आणि मला डायरेक्ट लग्नाचं विचारतात...’ मी कशीनुशी समजूत घालण्याच प्रयत्न केला. (तिच्यासमोर पडतं घेण्याला जी सुरूवात झालीय ती तेंव्हापासून...). मी तिला म्हंटलं, ‘तुम्हाला प्रत्यक्ष भेटतो, सविस्तर खुलासा करतो ’. दुसर्यां दिवशी तिच्या वसतिगृहावर गेलो. म्हणालो, ’ आपण बाहेर जाऊ या ’. रिक्षात बसलो आणि बाबा पेट्रोल पंपाजवळ नुकतंच सुरू झालेल्या ’56 भोग ’ या त्यावेळच्या पॉश रेस्टॉरंटमध्ये परवडत नसताना गेलो. काय घडलं त्याचा सविस्तर खुलासा केला. मग माझी व्यक्तिगत, कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक माहिती, माझे विचार असं सगळं सांगितलं. मग तिही खुलली. तिनं तिची सर्व माहिती सांगितली.

आपण दोघं एकमेकांना आवडू शकतो असं आमच्या लक्षात आलं.

एक दोन दिवस असंच आम्ही भेटलो. लग्न करायच्या निर्णयाप्रत आम्ही आलो. नंतर तिसर्या दिवशी ती लातूरला गेली. घरच्यांना विश्वासात घेतल्याशिवाय कोणताही निर्णय घेणं तिला योग्य वाटत नव्हतं.

नोंदणी पद्धतीनंच कमी खर्चात (कारण माझ्याच खर्चानं) लग्न करण्याचा माझा हट्ट होता. माझ्या आजोबांना आणि ज्योतीच्या वडिलांना तो मानावा लागला. 1988 या वर्षातला एप्रिलचा मह्निना. शहरात नुकतीच मोठी दंगल झालेली. अशा वातावरणात औरंगाबादच्या सुभेदारी या सरकारी विश्रामगृहाच्या एका पॅसेजमध्ये विवाह निबंधकाच्या समोर आम्हा दोघांचे जवळचे नातेवाईक, जवळचे मित्र अशा फक्त तीस जणांच्या उपस्थितीत एकमेकांच्या गळ्यात फुलांच्या माळा घालून आमचं लग्न पार पडलं.

चळवळीतल्या माझ्या अनेक मित्रांच्या लग्नाच्या हकिगतीच्या तुलनेत माझं लग्न प्रकरण अजिबात चित्तथरारक वगैरे नाहीये. खरं चित्तथरारक आहे ते लातूरची जिल्हास्तरावर सलग तीन वर्षे अजिंक्य ठरलेली ‘सायकलपटू ज्योती ’ ते मुंबईस्थित ‘कौशल्यप्राप्त वृत्तनिवेदक आणि सुपरिचित सूत्रसंचालक ज्योती’ अशा प्रवासाची कथा!

एखादी गोष्ट जमणार नाही असं कोणी डिवचलं की ज्योती पेटून उठते आणि मग असं काही करून दाखविते की डिवचणारा गप्पच बसतो, असा तिचा आत्तापर्यंतचा प्रवास आहे.

कॉलेजमध्ये असल्यापासून तिनं नौकरी केली आहे. सुरुवातीला क्लर्क टायपिस्ट म्हणून. पदवी अभ्यासक्रम करीत

असताना लातूरच्या स्थानिक दैनिकात ती अर्धवेळ काम करीत होती. तिथं तिला पत्रकारितेचा एक अभ्यासक्रम असतो असं कळालं. तो केल्यावर लवकर नौकरी मिळू शकते या समजूतीपोटी ती औरंगाबादला आली. ध्यानीमनी नसताना माझ्याशी लग्न झालं. अभ्यासक्रमानंतर लोकमतमध्येच नौकरी मिळाली. सरकारी नौकरीसाठी माझी निवड झाल्यावर स्थलांतर झाल्यानं तिनं नौकरी सोडली. माझी गोव्याला बदली झाल्यावर तिनं गोमंतकमध्ये अर्ज केला. त्यांनी सांगितलं, संपादकीय खात्यात जागा नाहीये, तुम्ही प्रुफरिडर म्हणून काम करू शकता. पत्रकरितेचे पदवी आणि लोकमतचा संपादकीय कामाचा अनुभव असूनही तुलनेने लहान असलेल्या वृत्तपत्रात प्रुफरिडर म्हणून काम करणं जगाच्या दृष्टीनं अपमानास्पद असूनही तिन होकार दिला. चांगलं काम केलंच शिवाय प्रुफरिडरशिपचं स्पेशयलायझेशनही शिकली. चंद्रकांत घोरपडेसारखे कडक शिक्षक तिथं संपादक होते. काही महिन्यातच तिथं ती उपसंपादक झाली.

गोव्याहून मी सातार्या ला आलो. दरम्यान तिनं भारतीय माहिती सेवेच्या जागेकरता युपीएससीत अर्ज केला होता. बैठक मारून बसणं, नोट्स काढणं, पाठांतर करणं अशा घासू ‘अभ्यासगिरी’चा तिचा पिंड नाही. पण तिनं मन लावून अभ्यास केला. जयती त्यावेळी केवळ सहा-सात महिन्यांची असेल. सलग दोन दिवसांचा रेल्वे प्रवास करून दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत तिनं जयतीला सांभाळत यशस्वीपणे मुलाखत दिली. तिची निवड झाली. पुण्यात पीआयबीत तिला पोस्टिंग मिळाली. मी सातार्या त होतो. तिनं एकटीनं पुण्यात सदाशिव पेठेत एक वर्षभर तरी पेयिंग गेस्ट्ची शिक्षा भोगली. तिच्या सारखी सतत उल्हासित, हसतमुख आणि धडपडी बाई रूक्षतेचा शाप मिळालेल्या सरकरी

वातावरणात कशी रमेल ही शंका खरी होण्याची वाट पाहात असतानाच तिनं तिथलं वातावरण तिच्या मैत्रीणीच्या साहाय्यानं अधिक उत्साही केलं.

मला मुंबईला यावं लागलं आणि पुन्हा तिची फरपट झाली. बाय द वे आमचे जेंव्हा केंव्हा कशावरूनही वाद होत असतात तेंव्हा, 'तू स्वतःहून बदल्या करवून घेतल्यास, माझी फरपट केलीस, मी अलिबागला सुखात होते, तू कारण नसताना मला गोव्यात नेलंस, गोव्यात स्थिरस्थावर झाले नाही तोवर मला सातार्यानला यावं लागलं, पुण्यात मी छान बस्तान बसवलं मग तू मला माझ्या इच्छेविरूद्ध मुंबईत आणलंस....' अशी तिची टेप ऐकून घेणं क्रमप्राप्त असतं. पुन्हा एकदा बाय द वे, आमच्यातही वाद होत असतात. (सुखावलात ना?) पण खरंच हे वाद एक मिनिटही टिकत नाहीत. (बरोबर, मी लवकर नांगी टाकतो, पण कधी कधी तीही समजूदारपणे वागते)

तर, तीही माझ्या मागोमाग मुंबईत आली. मुंबई पीआयबीत तिची बदली होऊ शकली. तिथं तिनं मन रमविण्याचा प्रयत्न केला. पण मग तिला दूरदर्शनचं जग गवसलं. तिथं ती वृत्त विभागात कॅज्युअल म्हणून काम करायला लागली. आधी कॅज्युअल ट्रांसलेटर, मग कॅज्युअल रिपोर्टर मग बदली वृत्तसंपादक म्हणून जायला लागली. हे जग तिला आवडायला लागलं. दूरदर्शनवर बातम्या वाचण्यासाठी नावं मागितली होती. तिनं कधी ते डोक्यातही आणलं नव्हतं. मीच तिला अर्ज करायला सांगितला. मी फारच मागं लागतोय पाहून तिनं गंमत म्हणून केला. लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा असे सारे टप्पे तिनं लिलया पार केले. बारा हजार अर्जदारांमधून ती पहिली आली.

आता तिला एकदम जबाबदारीची जाणीव झाली. मग तिनं जे कसून काम करायला सुरूवात केली की ज्याचं नाव ते. आवाजाच्या तालमीसाठी तिनं डॉ. अशोक रानडे सरांचं रितसर प्रशिक्षण घेतलं. अनेक महिने तासनतास आवाजाचे व्यायाम केले, (अजूनही अधूनमधून ती ते चित्र-विचित्र आवाजाचे व्यायम करत असते), बातम्या व्हीसीडीवर रेकॉर्ड करणं, असंख्य वेळा पाहाणं, चुका शोधणं, त्या टाळणं, रंगभूषेचं तंत्र समाजावून घेणं, वृत्तपत्रातल्या बातम्या मोठमोठ्यानं वाचण.... अरे बापरे! ज्योतीनं केलेली मेहनत कोणत्याही ऍथेलेटच्या मेहनतीपेक्षा कमी नव्हती.

पण अंगिकारलेल्या गुणांबरोबरच तिच्यातले अंगभूत गुणही तेवढेच महत्त्वाचे होते. एक म्हणजे ती खूप स्वच्छ, प्रवाही आणि नादमय बोलते. तिला स्वत:ला चांगलं व्यक्त होता येतं. तिचं बोलणं उत्स्फूर्त असतं. खूप आधी ठरवून अगदी घासूनपुसून असं काही ती बोलूच शकत नाही. त्यामुळे तिचं बोलणं नेहमीच अगदी जिवंत वाटतं. दुसरं, मराठवाड्यातली आणि लातूरची असूनही तिचे उच्चार प्रमाण उच्चार आहेत. 'ण' चा 'न' किंवा 'च'चा 'च्य' असं तिचं कधीच होत नाही. प्रमाण उच्चार सराईतपणे करणं ती कुठे शिकली कोणास ठावूक? तिसरं तिला कपड्यातलं उत्तम कळतं. तिचं आणि तिच्या बहिणींचं बालपण आणि कॉलेजपण खूप कष्टात गेलं. शानषौक फारसे करता आले नाहीत. पण रंगसंगती, कपडे, कशावर काय जातं याचं फार बारीक ज्ञान तिला आहे. हे तिनं कुठून आणलं याचं मला फार कुतुहूल आहे.

तिच्या आणखी एका गुणाचं मला फार कौतुक वाटतं. तिचं डोकं गणिती आहे आणि तिची स्मरणशक्ती दांडगी आहे. तिला

हिशोब पटकन जमतो. (पण तिला हिशोबी वागता येत नाही), एखादी सांगितलेली किंवा वाचलेली गोष्ट/लेख/बातमी त्याच्यातल्या तपशिलासह तिला पक्का लक्षात राहते. आणि ती त्यातल्या बारकाव्यासह पुन्हा सांगू शकते त्यात पुन्हा स्वतःचं स्वतंत्र विश्लेषणही ती तेवढ्याच तार्कीकपद्धतीनं करते.

सूत्रसंचालनात तिला तिच्या या गुणांचा खूप फायदा होतो. उगीचच अलंकारिक, खोटंखोटं, बटबटीत, पाल्हाळीक असं ती बोलत नाही. स्वतःचा, वक्त्यांचा आणि श्रोत्यांचा आब राखून हा कार्यक्रम आपणासर्वांचा आहे अशी कार्यक्रमाप्रती आपलेपणाची भावना प्रत्येकात निर्माण करणं सोपं नाही. तिच्या दिलखुलास स्वभावामुळे तिला ते सहज जमतं. तिला वेगळं काही करावंच लागत नाही.

तिच्या आणखी एका गुणाचा मी फॅन आहे. ती एकाच वेळी एखाद्या माणसाशी जेवढ्या मायेनं वागू शकते तेवढ्याच कठोरपणे त्याची उलटतपासणी घेऊ शकते. ती ज्या पद्धतीनं त्याची झाडाझडती घेते, त्यानं ती व्यक्ती सुधारतेच पण त्याला ज्योतीबद्दल कटुता वाटण्याऐवजी उलट जिव्हाळा वाटायला लागतो. अभ्यास करण्याजोगं प्रकरण आहे हे.

अभ्यासकरण्याजोग्या प्रकरणात तिनं टिकवलेले नातेसंबंध हेही समाविष्ट करावं लागेल. माझ्या आईचं म्हणजे तिच्या सासूचं आणि तिचं नातं एक अनोखा प्रकार आहे. सून आपल्या सासूच्या मांडीवर डोकं ठेवून झोपली आहे आणि सासू तिला थोपटते आहे, किंवा सासू सुनेची वेणी घालते आहे, किंवा सून सासूला आईच्या ममतेनं अगं-तुगं करते आहे किंवा सुनेचं ऐकत जा असं सासू आपल्या मुलाला सांगते आहे, असं दृश्य तुम्ही कधी पाहिलंय? आमच्या घरात ते पाहायला मिळेल.

मी तर काय तिचा नवरा असल्यामुळे तिच्या आज्ञेत असणारच पण माझे आई-वडील, तिचे आई-वडील, माझा भाऊ त्याची बायको, तिचा भाऊ, त्याची बायको, तिच्या बहिणी आणि त्यांचे नवरेसुद्धा तिचं ऐकतात. मला फारच कमाल वाटते. त्यांचीसुद्धा!

माझ्या मुलीचं जयतीचं भावविश्व ज्योतीनं अशा कौशल्यपूर्ण पद्धतीनं समृद्ध केलंय की ती जगाच्या कोणत्याही कोपर्या्ूत गेली आणि कोणतीही परिस्थिती ओढवली तरीही आत्मविश्वासानं उभी राहील आणि आनंदी राहील. अनेकदा मुलगी वयात येईपर्यंत तिचं आणि आईचं जमत असतं. मुलगी मोठी झाली की काहीतरी बिनसतं आणि त्यांच्यात तणाव निर्माण होतो, असं मी पाहिलंय. पण ज्योती आणि जयती या दोघी अगदी सख्ख्या मैत्रिणी असल्यासारखं एकमेकांना जपत असतात आणि नेहमी एकत्र आनंदानं इकडंतिकडं बागडत असतात. मी नसलो की त्यांचं स्वतःचं विश्व तयार करतात, ज्याचा मला खूप हेवा वाटत असतो.

मला ज्योतीनं खरोखरंच घडविलं आहे. अनेक वेळा मी तिच्या पद्धतीनं विचार करण्याचा, वागण्याचा आणि बोलण्याचा प्रयत्न करीत असतो. काहीवेळा जमतं, काही वेळा नाही. तिच्यासारखं वेळेच्या बाबतीत पक्का होण्याचा माझा प्रयत्न अजून सुरू आहे. मी खूप माणूसघाणा आणि एकलकोंडा होतो. ज्योतीनं माझा हा स्वभाव कमी करण्यासाठी बर्यानच टॅक्टीज वापरल्या. आमच्या दोघांमध्ये खरोखरच प्रचंड अंडरस्टॅंडिंग आहे. गैरसमज होणं, संशय घेणं, अर्धसत्य सांगण असं कधीही अगदी चुकूनही आमच्यात अजिबातच झालेलं नाही. त्याची आम्ही कल्पनाही करू शकत नाही. कारण आम्ही एकमेकांशी खूप बोलत

असतो. अर्थात ही प्रथा ज्योतीनंच सुरू केलीय. आम्ही तिघंही रोज सायंकाळी/रात्री घरी एकत्र जमलो आज काय काय घडलं हे सविस्तर सांगतो. प्रत्येकासाठी वेळ देतो. एकमेकांच्या फिरक्या घेतो. नवरा-बायकोसारखं वागण्यापेक्षा आम्ही मित्र-मैत्रिणीसारखं जास्त राहतो. आमचे मित्रमंडळ एकच असलं तरीही माझ्या मित्रमैत्रिणींध्ये ती ज्या सहजतेनं आमच्यातली एक होऊन जाते तेवढ्या सहजतेनं मी तिच्या मित्रमैत्रिणीमध्ये मिसळू शकत नाही. स्वभावाचा दोष. एकमेकांमधले गुणदोष आम्हाला पाठ असल्यानं उणीदुणी काढून आम्ही ओरखाडे काढत नाही. उलट दोघं दुसर्याढतले चांगले गुण शिकण्याचा प्रयत्न करीत असतो.

व्रतवैकल्य, आहेर-उपचार, नवस, सणावारांचे कर्मकांड अशात ती कधीच गुंतून पडत नाही. ती ज्या वातावरणात वाढली ते मात्र खूपच धार्मिक होतं. मी तर अजिबात धार्मिक नाही. पण आमच्यात कधीही यासंदर्भात जराही वाद झाले नाहीत. किंवा तपशिलात त्यावर बोलणंही झालेलं नाही. तिच्यात सहज बदल होत गेले. पण सणवाराचं वातावरण, आरत्या म्हणणं, कुटुंबातल्या सगळ्यांनी एकत्र येणं हे सगळं तिला खूप आवडतं. त्यात ती पूर्ण रमते. पण ते तेवढ्यापुरतंच. उत्सवातल्या मंडळीकरणाची तिला हौस आहे. त्यातलं कर्मकांड ती बाजुला ठेवते.

पाच बहिणी, एक भाऊ आणि वडील एकटे कमावते. मालकीचं घर/जमीन काहीही नाही. अशा अत्यंत निम्नमध्यमवर्गीय घरात ती वाढली. तसं लातूर हे शहर. घरची शेतीवाडी नाही. पण ज्योतीला शेती, पिकं, झाडं, फुल, फळं यांची सखोल माहिती आहे. हे तिनं कुठून मिळवलं आहे, हाही माझ्या कुतुहलाचा विषय आहे. नौकरी करीत ती शिकली तरीही तिला

स्वयंपाक उत्तम जमतो. झटपट, चविष्ट आणि पौष्टिक ही तिच्या सुगरणपणाची वैशिष्ट्ये आहेत. पण पुन्हा, कशाला प्राधान्य द्यायचं हे माहीत असल्यानं स्वयंपाकात उगीचच गुंतून पडत नाही. त्याचं अवडंबरही माजवत नाही. प्रत्येक गोष्टीचं काटेकोर नियोजन करण्याच्या सवयीमुळे ती खूप गोष्टी एकाच वेळी करू शकते.

मला वाटतं हे लिहिलं आहे तेवढं पुरेसं आहे. मराठवाड्यातल्या माणसांना आपल्या बायकोचं खाजगीतही कौतुक करण्याची सवय नाही. जाहीर तर नाहीच नाही. म्हणूनच होता होईल तो हातचं राखून ठेवत लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे.

हल्ली मी घेत असलेला अनुभव सांगायचा राहिला. वृत्तनिवेदन आणि सूत्रसंचालन यामुळे ज्योती बर्यामपैकी लोकांना माहीत झाली आहे. मी माझं नाव सांगितल्यावर ज्योती कुठं आसपास असेल तर समोरचा अंदाज घेत विचारतो, ‘मग त्या ज्योती अंबेकर तुमच्या कोण? ’, मी लगेच उत्तरतो, ‘मी तिचा नवरा’, माझ्या उत्तरातलं मर्म समोरच्याला कळालं आहे का हे पाहण्यासाठी मी क्षणभर त्याच्याकडे पाहातो.

- अजय अंबेकर

*******************